थोडक्यात...

## खडके प्राथमिक विद्या मंदिराचे स्नेहसंमेलन उत्साहात



**जळगाव ।** लेवा एज्युकेशनल युनियन संचालित श्रीमती शांताबाई लक्ष्मणराव खडके प्राथमिक विद्यामंदिर व कै. लक्ष्मण संपत खडके बालक मंदिराचे स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ मुख्याध्यापिका अंजना सुरवाडे यांचे मार्गदर्शनाखाली उत्साहात झाले. सुरुवातीला दिपप्रज्वलन करुन सरस्वतीपूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी किरण बेंडाळे होते.प्रमुख पाहुणे शिक्षण विस्तार अधिकारी विजय पवार यांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडला. व्यासपिठावर बेंडाळे कॉलेजच्या प्राचार्या गौरी राणे व नंदिनीबाई विद्यालयाच्या प्राचार्या चारुलता पाटील यांची उपस्थिती होती. तसेच संस्थेत दात्यांनी ठेवलेल्या ठेवीच्या व्याजातून विशेष प्राविण्य मिळविलेल्या गुणवंत विद्यार्थिनींना पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला. अहवाल वाचन मुख्याध्यापिका अंजना सुरवाडे यांनी केले. त्यानंतर विद्याथिनिंचा विविध लोकगीतांचा रंगारंग कार्यक्रम सोहळा दिमाखात पार पडला. अध्यक्ष व प्रमुख पाहुण्याचा परिचय धनराज नेहेते यांनी तर सुत्रसंचलन इरावती अहिरे, संगिता पाटील यांनी केले. सांस्कृतीक कार्यक्रमाचे सुत्रसंचालन भावना नेमाडे, सायली नेमाडे यांनी केले. आभार स्वाती फिरके यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## बाल महोत्सवातील विजेत्यांना पारितोषिक वितरण



**जळगाव ।** जिल्हा जिल्हा महिला व बाल विकास विभाग अधिकारी कार्यालय महाराष्ट्र शासनातर्फे चाचा नेहरु बाल महोत्सवाचे आयोजन छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल येथे करण्यात आले होते. यात जिल्हाभरातील ८०० स्पर्धक सहभागी झाले होते. या महोत्सवात खुबचंद सागरमल विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यश मिळविले. त्या विद्यार्थ्यांचा सत्कार मुख्याध्यापक योगिनी बेंडाळे, पर्यवेक्षक सुरेश यांचे हस्ते करण्यात आला. विजयी खेळाडू १०० व २०० मीटर धावणे सृष्टी शहा, लांब उडी प्रज्ञा साळवे, गोळा फेक नम्रता झोपे, लांब उडी लहान गट भारती बारेला, गोळा फेक कपिल बनसोडे, लांबउडी १०० मीटर धावणे अर्षद शेख, १०० मीटर धावणे मोठा गट महेक शेख, ४०० मीटर धावणे गुलशन कुशवाह व सांस्कृतिक कार्यक्रमात सामूहिक नृत्य द्वितीय क्रमांक - खुबचंद सागरमल विद्यालय जळगांव यांना मिळाला. यशस्वी विद्यार्थ्यांना विजय पवार, योगेंद्र पवार, सुनील साळवे, प्रवीण पाटील, कल्पना देवरे, लक्ष्मीकांत महाजन यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल गटविकास अधिकारी सरला पाटील, माध्यमिक शिक्षणाधिकारी कल्पना चव्हाण, उपशिक्षणाधिकारी फिरोज पठाण, शिक्षण विस्तार अधिकारी विजय पवार, खालील शेख, रागिनी चव्हाण तसेच रवीकिरण आहिरराव यांनी कौतुक केले आहे.

## संत ज्ञानेश्वर प्राथमिक विद्यालयात स्वेटर वाटप

**जळगाव ।** येथील श्री संत ज्ञानेश्वर प्राथमिक व माध्यमिक विद्यालय मेहरूण येथे देवरे कंट्रक्शन व महालक्ष्मी इन्फ्राटेक यांच्या सौजन्याने स्व. लिलाबाई पिरण देवरे यांच्या ४ थ्या पुण्यतिथी स्मरणार्थ संजय देवरे, मधुकर देवरे, अल्पेश देवरे यांच्या हस्ते इयत्ता तिसरीच्या गरीब व होतकरू मुलींना स्वेटर वाटप करण्यात आले. मुख्याध्यापक मुकेश नाईक यांनी विशेष प्रयत्न केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शितल कोळी यांनी केले. आभार रूपाली आव्हाड मानले.

# कुंडलीच्या गुणापेक्षा दोघांचे मने जुळले पाहिजे!

### हभप डॉ.विशालशास्त्री गुरुबा यांचे प्रतिपादन

**जळगाव । प्रतिनिधी**



विवाहासाठी वधू-वराचे कुंडलीत गुण जुळले नाही तरी चालेल, पण दोघांचे मने जुळणे पाहिजे. या जगात सर्वांचा पती परमेश्वर आहे, असे प्रतिपादन कथा व्यास हभप डॉ. विशालशास्त्री गुरुबा यांनी केले.

संगीतमय भागवत कथेत गोविंदा आला रे आला.. मच गया शोर सारी नागरी रे.. गोविंद बोलो हरी गोपाल बोलो अशा विविध भजनांनी दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी बाळ गोपाळ कृष्णाने आपल्यासवंगड्यासोबतदहीहंडीफोडली. या सोहळ्यात सामील होण्यासाठी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. यावेळी श्री कृष्ण आणि रुक्मिणीचा मोठ्या थाटामाटात विवाह सोहळा पार पडला. या विवाहात वधूचे मामा शरद तायडे तर वराचे मामा डॉ. निलेश चांडक होते. या विवाह सोहळ्यात जुने जळगाव येथील ग्रामस्थ सहभागी झाले होते. तरुण कुढापा मंडळातर्फे जुने जळगावातील मनपा शाळा क्रमांक ३, पांजरापोळ येथे २५ डिसेंबरपासून संगीतमय श्रीमद् भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी कथा मंडप फुलांनी सजविण्यात आलेला होता. कथेत बाळ गोपाळ कृष्णाचे अनेक प्रसंगांचे त्यांनी आपल्या सुमधुर वाणीतून वर्णन केले. गोपाळ कृष्ण कथेत पोहचल्यावर भाविकांनी त्याच्यावर पुष्पवृष्टी केली.

कथेच्या सातव्या दिवशी कथा दुपारी १ ते २ या वेळेत होत असून त्यात सुदाम चरित्र सांगण्यात येईल. कथेची सांगता होऊन गावातून भव्य अशी शोभायात्रा काढण्यात येणार आहे. या शोभायात्रेत ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन तरुण कुढापा मंडळातर्फे करण्यात आले आहे. नंतर बुधवारी गोपाळ काल्याचे किर्तन आणि महाप्रसादाचे वाटप होणार आहे.



### यांच्या हस्ते झाली महाआरती

कथेनंतर कॅन्सररोग तज्ञ डॉ.निलेश चांडक, डॉ. अमित भंगाळे, डॉ. नेहा भंगाळे, शिवसेना महानगर प्रमुख शरद तायडे, हरीश कोल्हे, प्रशांत सुरळकर, मुन्ना मराठे यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. यावेळी श्रोते भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### कपाळाला गंध हीच हिंदूंची ओळख

हिंदू धर्मात गंधाला खूप महत्त्व आहे. शास्त्रानुसार नित्यनियमाने गंध लावणे सज्जन, सुसंस्कृत मनुष्याची ओळख आहे. प्रत्येक हिंदूने कपाळावर गंध लावला पाहिजे, जो गंध लावत नाही तो हिंदू नाही, असे मत डॉ.गुरुबा यांनी आपल्या मधुर वाणीतून सांगितले.



### आमदार भोळेंची भेट

कथा सोहळ्यासाठी श्रीराम जन्म आणि कृष्णजन्म उत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा झाला. या संगीतमय भागवत कथेला शहराचे आमदार राजूमामा भाषल यांनी भेट दिली. यावेळी महिला भाविकांनी भजनात तल्लीन होऊन ठेका धरला. तसेच फुगळी खेळून जन्म सोहळा मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी बाळ कृष्णाला वासुदेव आपल्या डोक्यावर घेऊन द्वारकेतून बाहेर काढतो असा जिवंत देखावा यावेळी करण्यात आला होता. हा जन्म हा जन्मोत्सव साजरा करण्यासाठी कथा मंडप केळीच्या झाडांनी फुलांनी सजविण्यात आलेला होता. असे अशा प्रसन्नमय वातावरणाने भाविकांचे पाय धिरावले.

## सॅम बालकांची १० जानेवारीला होणार तपासणी

**जळगाव । प्रतिनिधी**

जळगाव जिल्हा परिषदेच्या महिला बालकल्याण विभाग व आरोग्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने कुपोषित बालकांची विशेष तपासणी मोहीम दि.१९ व २३ डिसेंबर रोजी राबविण्यात आली होती. आता उर्वरित सॅम बालकांची तपासणी दि. १० जानेवारी रोजी करण्यात येणार आहे.

गेल्या जुलै २०२३ मध्ये १८८९ कुपोषित बालके आढळून आली होती. आता नोव्हेंबर २०२४ या महिन्यात झालेल्या सर्वेक्षणात ७३२ कुपोषित बालके आढळली आहे. त्यात कुपोषित आढळून आलेल्या सॅम आणि मॅम बालकांची शोधमोहीम राबवून त्यांच्यावर वेळोवेळी उपचार करण्यावर भर दिला आहे.



प्रत्येक महिन्याला तालुकानिहाय आढळलेल्या कुपोषित बालकांची तपासणी करण्यात आली असून त्या त्या तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांत त्यांच्या उपचार देखील करून आणि पोषक आहार देवून त्यांच्यात सुधारणा झालेली आहे. त्यामुळे कुपोषित बालकांच्या टक्केवारीत घट झाली. आता जिल्हा परिषदेच्या महिला बालकल्याण विभागामार्फत दि. १९ व २३ डिसेंबरपासून विशेष आरोग्य तपासणी शिबिर प्रत्येक तालुक्यात घेण्यात आली होती. त्यात २१९ बालकांची तपासणी करण्यात आली.५३५ बालकांना औषधी देण्यात आली असून ६ बालके शस्त्रक्रियेसाठी संदर्भित करण्यात येणार आहे. तर ४७ बालके पोषण पुनर्वसन केंद्र मोहाडी येथे संदर्भित करण्यात येणार आहे. तसेच दि. १० जानेवारी रोजी उर्वरित सॅम बालकांची तपासणी मोहीम राबविण्यात येणार असून वैद्यकीय अधिकारी, बालविकास प्रकल्प अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी,गटविकास अधिकारी यांनी दि.१० जानेवारी रोजी होणाऱ्या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन महिला व बालकल्याण विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी हेंमतराव भदाणे यांनी केले आहे.

## शौर्य दिनाचा इतिहास मानवता अन् स्वाभिमानाची प्रेरणा



**जळगाव । प्रतिनिधी**

### साहित्यिक जयसिंग वाघ यांचे प्रतिपादन

जनतेवर अत्यंत जुलूम, जबरदस्ती करून त्यांचे जिणे मुश्किल करणाऱ्या शासनाविरोधात सन १८१८ ला जगात प्रथमच मोठे युद्ध झाले. यात अवघ्या पाचशे लोकांनी अठ्ठावीस हजार सैन्य कापून काढले आणि सत्ता उलथवून लावली. त्या क्रांतीचे स्मरण व्हावे म्हणून १ जानेवारी हा दिवस शौर्य दिन म्हणून साजरा केला जातो. हा दिवस माणसाला मानवता व स्वाभिमान काय असतो हे दाखवून देतो, असे प्रतिपादन प्रसिद्ध साहित्यिक जयसिंग वाघ यांनी केले.

१ जानेवारी रोजी सकाळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दल, परिवर्तन ग्रुपतर्फे शौर्य दिनानिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात भाषण करतांना वाघ बोलत होते..यावेळी बी.एस.पवार यांनी मनोगत व्यक्त केले. सुरवातीस सामूहिकपणे त्रिसरण, पंचशिल घेण्यात आले. त्यानंतर समता सैनिक दलाचे डॉ.सचिन नरवाडे यांनी बाबासाहेबांच्या पुतळ्यास मानवंदना दिली. परिवर्तन ग्रुपतर्फे पुतळ्याचे सुशोभीकरण करण्यात आले होते.

शौर्य दिनाच्या जय जय काराने परिसर दणाणून गेला होता. याप्रसंगी मोहन बिऱ्हाडे, कैलास उमाळे, स्वप्नील सोनवणे, चैत्राम भालेराव, सुनील शिरसाठ, ज्योती भालेराव, राधा जवरे, शोभा इंगळे, प्रमिला इंगळे, शोभा पातुडे, ज्योती निकम, यशोदा बागुल, विद्या झनके, ज्योती दाभाडे, भारती बिऱ्हाडे, ज्योती सोनवणे, उषा इंगळे यांच्यासह स्त्री, पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेश इंगळे यांनी केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सागर सदावर्ते यांनी केले. आभार युवराज पारधे यांनी मानले.

## शानभागच्या विद्यार्थ्यांचे स्काऊट गाईड परीक्षा शिबिर

**जळगाव । प्रतिनिधी**

विवेकानंद प्रतिष्ठान संचालित कै.श्रीमती ब.गो.शानभाग विद्यालयातील विद्यार्थ्यांचे स्काऊट राज्य पुरस्कार शिबीर दि. १९ ते २२डिसेंबरदरम्यान दोंडायचा येथे घेण्यात आले होते. या परीक्षा शिबिराला आपल्या शानभाग विद्यालयातील इ.८ वी च्या समर्थ दाहिभाते जय येदे, आयुष जैन, सोहम पाटील, शौर्य पाटील, तन्मय कोळी, दक्ष पाटील आणि इ. ९ वी च्या प्रणव सोनवणे असे एकूण आठ विद्यार्थी सहभागी झाले होते. यात जळगाव, धुळे, नासिक, नंदुरबार या चार जिल्ह्यातील एकूण १३० स्काऊट विद्यार्थी सहभागी झाले होते यात ५० गुणांची लेखी परीक्षा व १५० गुणांची प्रात्यक्षिक व तोंडी परीक्षा घेण्यात आली तसेच २३ ते २६डिसेंबर रोजी मुलींचे म्हणजेच गाईड परीक्षा शिबिर दोंडाईचा येथील हस्तीभवन या ठिकाणी होणार आहे यात आपल्या शाळेतील ७ विद्यार्थिनी सहभागी झाल्या आहेत यात युतिका पाटील, श्रुती परदेशी, आर्या पाटील, धनश्री महाजन, मानसी सैंदाणे, मानसी वानखेडकर, सोनम पाटील विद्यार्थीनींनी एकूण २० प्रात्यक्षिक परीक्षा दिल्या. त्यानंतर लेखी परीक्षा पण दिल्या. या सर्व प्रकारच्या परीक्षेत त्यांनी यश संपादन केले.

त्यांना खूप शिकायला मिळाले. शिबिरासाठी ४ जिल्ह्यातील- नाशिक, धुळे, नंदूरबार, जळगाव एकूण १९२ विद्यार्थिनींचा सहभाग होता. जळगाव जिल्ह्यातील एकूण ४ शाळांपैकी आपल्या शाळेतील विद्यार्थिनीना फ्लॅग होस्टिंग करण्याची संधी मिळाली गुरुवारी सकाळी सर्वधर्म प्रार्थना चे आयोजन करण्यात आले.या शिबिरासाठी विद्यालयाचे मा.मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर पाटीलसर यांच्या मार्गदर्शनाखाली रवींद्र सैदाणे आणि नंदिनी टाकणे यांनी परिश्रम घेतले.

## स्वामी विवेकांनद महाविद्यालयातील आदित्य जाधवची स्कॉश स्पर्धेसाठी निवड

**जळगाव । प्रतिनिधी**

शालेय राज्यस्तर स्कॉश स्पर्धेसाठी स्वामी विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालयाच्या आदित्य जाधवची निवड झाली. नुकत्याच जळगाव येथे झालेल्या शालेय विभाग स्कॉश स्पर्धेमध्ये कु आदित्य जाधव १९ वर्षे आतील गटात पाचवा क्रमांक पटकावला. राज्यस्तर स्पर्धा चार ते पाच जानेवारी पुणे येथे होणार आहेत. मार्गदर्शन क्रीडा शिक्षक, प्रा.डॉ. रणजीत पाटील, प्रा.प्रवीण कोल्हे यांचे मार्गदर्शन लाभले. के.सी.ई सोसायटीचे अध्यक्ष प्रज्ञावंत नंदकुमार बेंडाळे, कोषाध्यक्ष डी.टी.पाटील, प्राचार्य डॉ. स. ना.भारंबे, उपप्राचार्य के. जी.सपकाळे यांनी कौतुक केले.

## आजपासून बालगंधर्व संगीत महोत्सव

**जळगाव । प्रतिनिधी**

भारतीय अभिजात संगीताचा व खान्देशच्या संगीत रसिकांच्या सांस्कृतिक कक्षा रूंदावणारा, खान्देशचा सांस्कृतिक मानदंड म्हणून संगीत रसिकात मान्यता पावलेला २३ वा बालगंधर्व संगीत महोत्सवास दि. ३ जानेवारीपासून छत्रपती संभाजी महाराज नाट्यगृहात प्रारंभ होत आहे. या महोत्सवाची तयारी पूर्ण झाली असल्याची माहिती स्व. वसंतराव चांदोरकर प्रतिष्ठानचे कार्यकारी विश्वस्त दीपक चांदोरकर यांनी दिली.

नारायण राजहंस तथा बालगंधर्व यांचे बालपण हे जळगावात गेले. त्यामुळे त्यांची स्मृती म्हणून या संगीत महोत्सवाचे स्व. वसंतराव चांदोरकर प्रतिष्ठानच्यावतीने गेले २२ वर्षांपासून अत्यंत देखणे असे आयोजन केले जात आहे. या संगीत महोत्सवाचे उदया शुक्रवारी दि. ३ जानेवारी रोजी सायंकाळी सात वाजता जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांचे हस्ते उदघाटन होईल .

या प्रसंगी जळगाव जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष सतीश मदाने, वेस्टर्न इंडिया केमिकल्स मुंबईचे कार्यकारी संचालक राजेश गाडगीळ, सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे क्षेत्रीय प्रबंधक ए.व्ही. रमणमूर्ती यांची प्रमुख उपस्थिती असेल.

## दिवंगत खेळाडू मित्रांच्या स्मृतिप्रीत्यर्थ उद्या बारावी मास्टर्स चषक क्रिकेट स्पर्धा

**जळगाव । प्रतिनिधी**

जळगाव शहर व तालुका क्रिकेट असोसिएशनतर्फे दिवंगत खेळाडू मित्रांच्या स्मृतीप्रित्यर्थ दरवर्षी मास्टर्स चषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात येत असते. यंदाची ही सलग बारावी स्पर्धा असून शनिवार दि.४ जानेवारी रोजी एकलव्य क्रीडा संकुल, एम. जे. कॉलेज मैदानावर होणार आहे. १९८० च्या उत्तरार्धात आणि १९९० खेळलेले खेळाडू आपल्या दिवंगत खेळाडू मित्रांच्या आठवणीत मैदानात उतरत असतात. या स्पर्धेच्या उद्घाटन व बक्षीस वितरण समारंभाला केंद्रीय क्रीडा राज्य मंत्री ना.रक्षाताई खडसे, आ. राजुमामा भोळे, आ.प्रा. चंद्रकांत सोनवणे, उद्योगपती श्रीराम खटोड, सिनिअर एक्साईज इन्स्पेक्टर मनोज चौधरी(मुंबई), खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष नंदकुमार बेंडाळे, एकलव्य क्रीडा संकुलाचे प्रशासकीय अधिकारी प्रा.डॉ.श्रीकृष्ण बेलोरकर, सुरेश कलेक्शनचे मुकेशभाई हासवाणी, मातोश्री फायनान्सचे अभिजित पाटील, गव्हर्नमेंट कॉंट्रॅक्टर अनिल सोनवणे, अपर्णा ऑटोमोटिव्हचे किरण कासार, शेखर देशमुख, श्रीराम फायनान्सचे झोनल मॅनेजर श्रीपाद डांगरीकर, युनिक एक्काचे संतोष बरडे, श्री आर्ट्सचे जितेंद्र चव्हाण आदी उपस्थित राहणार आहेत. आजी माजी खेळाडू क्रिकेट प्रेमींनी स्पर्धेला उपस्थित उपस्थित राहावे, असे आवाहन जळगाव शहर व तालुका क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष राजु खेडकर, उपाध्यक्ष शरीफ पिंजारी, सचिव ॲड. केतन ढाके, कोषाध्यक्ष बाबा शिर्के, नरेश देशपांडे, युवराज वाघ, ॲड. नितीन देवराज, अनंता पाटील, विजय किनगे, हेमंत वाघ, अमोल सोले, तुषार प्रधान यांनी केले आहे. स्पर्धा आयोजनासाठी किरण चौधरी, प्रा.डॉ.हसीन तडवी, नितीन पाटील, राहुल चौधरी, अजय हंसकर, ज्ञानेश्वर कोळी,सुमित अहिरराव, केतन अहिरराव आदी परिश्रम घेत आहेत.

# वाचन अभियान : होय, बेंडाळे कॉलेज वाचत आहे...!

### बेंडाळे महिला महाविद्यालयात सामूहिक वाचन

**जळगाव । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागातर्फे दि. १ ते १५ जानेवारी या कालावधीत वाचन पंधरवडा उपक्रम महाराष्ट्रातील सर्व महाविद्यालयांमध्ये राबविला जात आहे. त्या अनुषंगाने डॉ. अण्णासाहेब जी. डी. बेंडाळे महिला महाविद्यालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमाचा भाग म्हणून आज महाविद्यालयात सामुहीक वाचन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी विद्यार्थिनींनी ग्रंथालयातून आपल्या आवडीची कथा, कादंबरी,चरीत्र, कविता अशी पुस्तके घेवून विद्यार्थिनीनी उत्स्फूर्तपणे सामुहीक वाचन केले. वाचनानंतर कु.सलोनी मावची, तेजल पाटील, सृष्टी शुक्ला, रागिणी सोनवणे, ओजस्विनी सोनवणे या विद्यार्थिनींनी मराठी साहित्यातील मार्मिक आणि विनोदी लेखन करणारे महाराष्ट्र भूषण पु.ल.देशपांडे यांच्या विनोदी लेखनाचे वाचन करून उपस्थितांना खळखळून हसवले.



महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.गौरी राणे यांनी वाचाल तर वाचाल...! असे वाचनाचे महत्व विद्यार्थिनीना पटवून दिले. तसेच शासनाच्या नाविन्यपूर्ण उपक्रमाची माहिती सांगत विद्यार्थिनीना दिली. ब्यापुढे स्त्री शक्तीचा वारसा सांगताना सावित्रीबाई फुले यांच्या शिक्षण क्रांतीच्या संदर्भात पुण्यामध्ये घडलेल्या बाहुलीचा हौद या कथेचे वाचन करून विद्यार्थिनींना अंतर्मुख केले.या उपक्रमांतर्गत विद्यार्थिनींना वाचनासाठी अवांतर पुस्तके उपलब्ध करून दिलेली असून विद्यार्थिनी मोठ्या संख्येने ग्रंथ वाचून त्याचे परीक्षण करीत आहेत. पहिल्याच दिवशी या उपक्रमास शेकडो विद्यार्थिनींनी प्रतिसाद दिला. स्पर्धेतील विजेत्यांना २६ जानेवारी रोजी पारितोषिक देऊन गौरविण्यात येईल. ३ रोजी सावित्रीबाई फुले जयंती निमित्त माजी विद्यार्थिनी सुनिता नारखेडे यांच्या २ ग्रंथांचे प्रकाशन करण्यात येईल.